**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत आराखडा
## माहिती संकलनासंदर्भात कुलगुरुंचे प्राचार्यांना आवाहन
## ८ जुन पर्यंत पाठवावी लागेल माहिती

अमरावती.

विद्यापीठ कायद्यानुसार डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या मार्गदर्शक तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत आराखडा सन २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीकरिता तयार करावयाचा आहे. हा बृहत आराखडा सर्वसमावेशक तयार होण्यासाठी प्राचार्य, संस्थाध्यक्ष व संबंधित घटकांना पुढाकार घेवून विविध घटकांच्या माध्यमातून माहिती संकलित करण्याबाबत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी आवाहन केले आहे.

आपल्या आवाहनात ते म्हणतात, महाराष्ट्रातील उच्चशिक्षण कशा प्रकारे राहील, त्याची दिशा या आराखड्याच्या निमित्ताने निश्चित होणार आहे. यापूर्वी विद्यापीठाने हिततुल्य घटकांसाठी कार्यशाळा आयोजित करुन त्यांची मते, विचार व सूचना जाणून घेतल्यात. केवळ मास एज्युकेशन पुरेसे नाही, तर त्यामध्ये गुणवत्तासुद्धा आवश्यक आहे. इन्क्लुझन, एक्स्पान्शन आणि एक्सलन्स ही त्रिसूत्री महत्वाची आहे. पूर्वी बृहत आराखडा संख्येच्या आधारावर बनायचा; पण आता नीड बेस्ड एज्युकेशन महत्वाचे आहे, त्याकरिता सर्वेक्षणाच्या माध्यमातून सर्व प्राचार्यांना आकडेवारी गोळा करावयाची आहे. वर्तमानकाळातील विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेवून विद्यार्थ्यांना हवे ते शिक्षण मिळावे, यासाठी प्राप्त आकडेवारी दिशादर्शक राहणार आहे. प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे आपल्या विभागात कोणत्या प्रकारच्या महाविद्यालयांची, अभ्यासक्रमांची, कौशल्य आधारित अभ्यासक्रमांची मागणी, याबाबत विद्यापीठाला बोध होईल आणि त्यानुसार त्याचा समावेश विभागातील बिंदू ठरवितांना आराखड्यात करता येईल. तरी सर्व संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, उद्योजक, नियोक्ता, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, एन.जी.ओ. आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रपत्रात माहिती भरण्याकरिता प्राचार्यांना सहकार्य करावे, असे आवाहन कुलगुरुंनी केले आहे.

### बृहत आराखडा संबंधी माहिती संकलनाबाबत मार्गदर्शक तत्वे

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना महाविद्यालयीन विभागाद्वारे बृहत आराखड्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे, माहितीची प्रश्नावली, कुलगुरुंचे आवाहन आणि प्रपत्रामध्ये माहिती कशी भरायची याबाबत पी.पी.टी. आदी प्राचार्यांच्या ईमेलवर पाठविली आहे. प्राचार्यांना अकरा घटकांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित करावयाची असून सर्व प्रश्नावली गुगल फॉर्ममध्ये तयार करण्यात आल्या आहेत. प्रत्येक घटकांसाठी एक असे अकरा गुगल फॉर्मस् तयार केले असून त्याची लिंक महाविद्यालयांना पाठविली आहे. फॉर्म ऑनलाईन पद्धतीने दि. ८ जुन, २०१८ पर्यंत सादर करावयाचे असून विद्यार्थ्यांनासुद्धा लिंक पाठवावयाची आहे, म्हणजे ते आपल्या मोबाईलवरुन माहिती भरु शकतील. अकरा घटकांतील वर्गवारींसाठी टक्केवारी निश्चित करण्यात आली असून त्याबाबत अडचण असल्यास संपर्क साधण्याकरिता संबंधित जिल्हावार संपर्क साधणाऱ्यांची नावे व मोबाईल नंबर सुद्धा महाविद्यालयांना पाठविलेल्या पत्रात दिले आहेत. तरी सर्व प्राचार्यांनी याची नोंद घ्यावयाची असून त्यापद्धतीने तातडीने अंमलबजावणी करुन विद्यापीठाला सहकार्य करावे, अशी विनंती प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, महाविद्यालयीन विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी केली आहे.

### व्हर्च्युल सी-फोरवर कुलगुरुंची ६ जुनला मुलाखत

विद्यापीठाच्या व्हर्च्युल सी-फोरवर कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर हे दि. ६ जुन रोजी दुपारी २.०० वाजता बृहत आराखडा संदर्भातील मार्गदर्शक तत्वे आणि हा बृहत आराखडा तयार करण्यासंदर्भात शासनाचे धोरण, महाविद्यालयांच्या प्राचार्यांना करावयाची कार्यवाही, सर्वसंबंधित घटकांचे सहकार्य आणि एकूणच सर्वसमावेशक बृहत आराखडा तयार होण्यासाठी मुलाखतीद्वारे आवाहन करणार आहे. तरी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाध्यक्ष, विद्यार्थी तसेच हिततुल्य घटक यांनी विद्यापीठाची वेबसाईट www.sgbau.ac.in यावरुन कुलगुरुंच्या होणाऱ्या मुलाखतीचा लाभ घ्यावा, अशी विनंती व्हर्च्युल सी-फोरचे अध्यक्ष प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख व समन्वयक डॉ. मोना चिमोटे यांनी केली आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०५/०६/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी